# यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक
## वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखा

विद्याशाखा परिषद बैठक - इतिवृत्त

वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखा परिषदेची सभा शनिवार दि. 29.08.2020 रोजी सकाळी 11.30 वाजता ऑन लाईन बैठक आयोजित करण्यात आली होती. सादर बैठकिस खालील सदस्य उपस्थित होते.

| | | |
|---|---|---|
| 1. | मा. डॉ. पंडित पलांडे, संचालक, वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखा | अध्यक्ष |
| 2. | डॉ. राजश्री शिंदे, पुणे. | सदस्य |
| 3. | डॉ. महेश कुलकर्णी, नाशिक | सदस्य |
| 4. | डॉ. आर एन नायर, डोंबिवली | सदस्य |
| 5. | डॉ. सुरेंद्र पाटोळे, सहा. प्राध्यापक, वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखा | सदस्य |
| 6. | डॉ. प्रमोद खंदारे, प्र संचालक, संगणक विद्याशाखा | सदस्य |
| 7. | डॉ. कविता साळुंके,प्र. संचालक, शिक्षणशास्त्र विद्याशाखा | सदस्य |
| 8. | डॉ. जयदिप निकम, संचालक, आरोग्य विज्ञान विद्याशाखा | सदस्य |
| 9. | डॉ. लतिका गायकवाड, सहा प्राध्यापक, वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखा | सदस्य सचिव |

डॉ. व्ही.एम. चव्हाण, कोल्हापूर, हे सदस्य काही अपरिहार्य कारणामुळे सभेस उपस्थित राहू शकले नाहीत.सभेच्या सुरवातीस विद्याशाखा परिषद अध्यक्ष यांनी उपस्थित असलेल्या सर्व सदस्यांचे स्वागत केले. सदर बैठकीत पुढील विषयांवर चर्चा होऊन सर्वानुमते निर्णय घेण्यात आले.

| विषय क्र | विषय पत्रिका/तपशिल |
|---|---|
| वाणिज्य/2020 1.1 | दि. 17.10.2019 रोजी झालेल्या विद्याशाखा परिषदेच्या बैठकीचे इतिवृत्त वाचून कायम करणे.<br>ठराव- दि. 17.10.2019 रोजी झालेल्या विद्याशाखा परिषदेच्या बैठकीचे इतिवृत्त वाचून कायम करण्यात आले. |
| वाणिज्य/2020 1.2 | एम.बी.ए शिक्षणक्रमाच्या प्रकल्प आराखडा व प्रकल्प अहवाल पुर्नतपासणीसाठी तज्ञ व्यक्तींना मानधन देणेबाबत..<br>टिपणी- एम बी ए शिक्षणक्रमाचे दरवर्षी साधारण 2000 प्रकल्प आराखडा व प्रकल्प अहवाल प्राप्त होतात. त्यातील बरेचसे प्रकल्प आराखडा व अहवाल तज्ञांकडून अमान्य करून त्यात दुरुस्ती सुचवीली जाते. त्यानुसार विद्यार्थी दुरूस्त्या करून पुनश्च सादर करतात. सदर पुर्नसादर केलेले प्रकल्पा आराखडा व प्रकल्पा अहवाल तज्ञ व्यक्तींना पुन्हा तपासावे लागतात. त्यामुळे या तपासणीसाठीही तज्ञांना प्रचलीत दराप्रमाणे पुर्नतपासणीचे मानधन देणे गरजेचे आहे. सदर विषय विद्याशाखा समितीपुढे सविनय सादर..<br>ठराव- जानेवारी 2020 पासून विद्याशाखेत प्राप्त झालेले सर्व प्रकल्प आराखडा व प्रकल्प अहवाल या संदर्भात वरील निर्णय सर्वानुमते मान्य करण्यात आला. |
| वाणिज्य/2020 1.3 | एम बी ए शिक्षणक्रमाचे विद्याशाखेत प्राप्त झालेल्या प्रकल्प आराखडा व प्रकल्प आहवाल हे विद्याशाखेत प्राप्त झाल्यापासून ते तपासणी झाल्यानंतर त्याचे गुण परीक्षेपर्यंत पाठविणे पर्यंत असंख्य टप्प्यातुन प्रक्रिया पार पाडाव्या लागतात उदा. प्रकल्प आराखडा व अहवाल यांचे अभ्यासकेंद्र व विभागीयकेंद्र निहाय नोंदणी करणे, विगतवारी करणे, प्रत्येक प्रकल्प आराखडा व अहवालाची छापील नोंद ठेवणे, ते तज्ज्ञ व्यक्तींना पोहोचते करणे, तदनंतर ते पुनश्च त्यांचे कडून जमा करणे, अभ्यासकेंद्र व विभागीय केंद्र निहाय गुणांची तसेच त्याच्या status ची नोंदी करणे व ते अभ्यासकेंद्र व विद्यार्थ्यांना कळविणे ही सर्व कामे विद्याशाखेत पार पाडण्यासाठी मात्र रु. 25/- प्रती अहवाल देय होते. परंतु या कामाची वाढलेली व्याप्ती पहाता प्रकल्पा आराखडाची नोंदणी व तत्सम कामे रु.25/- प्रती प्रकल्प आराखडा मानधन प्रशासकीय काम करणा-या व्यक्तीस देय आसावे तसेच प्रकल्प अहवाल तपासणे बाबत सर्व |

...मुक्त विद्यापीठ, नाशिक.
आवक क्र. VC/1122
दि 04/09/2020

| | |
|---|---|
| | बाबत प्रशासकीय सेवकास करावी लागतात. ...ल्प आराखडा बाबत जी करावी लागतात तीच कामे प्रकल्प अहवाल या तरयम कामासाठी प्रती प्रकल्प अहवाल रु. 50/- मानधान प्रशासकीय काम करणा-या व्यक्तीस देय असावे.<br>ठराव- सदर विषय शैक्षणिक वर्ष 2020-21 रा... स्थगीत ठेवण्यात आला तसेच यापूर्वी प्रमाणे रु. 25/- प्रति आराखडा व प्रति अहवाल मानधन देय राहिल असे सर्वानुमते ठरले. |
| वाणिज्य/2020<br>1.4 | वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखेत फेब्रुवारी 2007 नंतर प्रवेशीत झालेल्या पीएच.डी शिक्षणक्रमाच्या विद्यार्थीची पदवी वाणिज्य किंवा व्यवस्थापन विषयात देणे बाबत..<br>टिपणी- सन 2007 पर्यंत विद्यापीठामध्ये वेगवेगळ्या विषयातील पीएच.डी संदर्भातील सर्व कार्यवाही शैक्षणिक सेवा विभाग यांच्यातर्फे केली जायची. तसेच या विभागामध्ये प्रवेशीत झालेल्या विद्यार्थींना विषय संप्रेशन/दूरशिक्षण/शैक्षणिक संप्रेशन या तीन विषयात पीएच.डी पदवी प्रदान केली जायची. दि. 5 फेब्रुवारी 2007 रोजी संदर्भ क्र. YCMOU/M&R/07/604 नुसार विद्यापीठाच्या व्यवस्थापन मंडळाने Ordinance No.36(1/2007) नुसार Resolution No.A-100/07/13 dt.17 January 2007 नुसार शुद्ध वाणिज्य व व्यवस्थापन या दोन विषयात पीएच.डी सुरु करण्यासंदर्भातील वरील Ordinance व्यवस्थापन मंडळाने मान्यता दिलेली आहे. सदर Ordinance नुसार त्या त्या विषयातील पीएच.डी संबंधीत विद्याशाखेत सुरु करण्यात आली. त्यानुसार वाणिज्य व व्यवस्थापन विषयातील पीए.डी ची नोंदणी प्रक्रीया व पुढील सर्व कार्यवाही शैक्षणिक सेवा विभागाकडून वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखेकडे वर्ग करण्यात आली.<br>दि. 05 फेब्रुवारी 2007 नंतर वाणिज्य व व्यवस्थापन या दोन विषयात प्रवेशीत झालेले वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखेतील विद्यार्थ्यांना वाणिज्य व व्यवस्थापन या दोन शुध्द विषयात पीएच.डी ची पदवी प्रदान करणे आवश्यक होते. परंतू काही तांत्रीक चूकांमुळे ब-याच विद्यार्थींना Subject Communication-Commerce आणि Subject Communication-Management अश्या पदव्या प्रदान करण्यात आल्या. त्यामुळे ब-याच विद्यार्थींनी त्यांची पदवीही शुध्द वाणिज्य किंवा व्यवस्थापन या विषयात बदलून मिळावी अशी विनंती विद्यार्थींनी विद्याशाखेकडे नोंदविली. या संदर्भातल विषय व्यवस्थापन मंडळीच्या दि. 17 डिसेंबर, 2019 संदर्भ क्र. 171.4.1 नुसार बैठकीपुढे निर्णयासाठी ठेवण्यात आला होता. व्यवस्थापन मंडळीने सदर विषय वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखेपुढे ठेवावा असे सुचविले.<br>ठराव-सदर विषयाबाबतीत या संदर्भातील सर्व आवश्यक कागदपत्रांचे अवलोकन करून त्यावरील अंतीम निर्णय घेण्यासाठी मा. संचालक, वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखा यांचे अध्यक्षतेखाली एक त्रीसदस्यीय समीती स्थापन करण्यात आली. या समितीत वाणिज्य विषयातील तज्ज्ञ- प्रा डॉ. महेश कुलकर्णी, नाशिक, तसेच व्यवस्थापन विषयातील तज्ज्ञ प्रा. डॉ. राजश्री शिंदे, पुणे यांची नियुक्ती केली. सदर समिती सर्व कागदपत्रांचे अवलोकन करून पुढील एक महिन्यात आपला अहवाल वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखेकडे सुपूर्द करतील. असे सर्वानुमते ठरले. |
| वाणिज्य/2020<br>1.6 | एम बी ए शिक्षणक्रमाअंतर्गत प्रकल्प अहवाल तयार करणेसाठी अंतर्गत तज्ज्ञांची मदत विद्यार्थ्याला घ्यावी लागते. सदर अंतर्गत तज्ज्ञाला प्रकल्प आराखडा व अहवाल तयार झाल्यानंतर त्याचे मानधन हे केंद्राने विद्यार्थीकडून मिळालेल्या शैक्षणिक शुल्काअंतर्गत मिळालेल्या शुल्कातूनच अंतर्गत तज्ज्यांना द्यावे या आशयाचे पत्र मा संचालक, वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखा यांनी दि. 22.10.2019 रोजी सर्व अभ्यासकेंद्रांना पाठविलेले आहे.<br>ठराव- सदर विषयास सर्वानुमते कार्योत्तर मान्यता देण्यात आली. |
| वाणिज्य/2020<br>1.7 | मा. अध्यक्षांच्या परवानगीने ऐनवेळचे विषय---<br>बी.कॉम शिक्षणक्रमाच्या सध्या सुरु असलेल्या पुनरचने संदर्भात निर्णय घेणे बाबत...<br>ठराव- सदर शिक्षणक्रमासाठी नियुक्त केलेल्या राज्यस्तरीय सल्लागार समितीची बैठक बोलावून त्यापुढे हा विषय सादर करावा असे सर्वानुमते ठरले. |
| वाणिज्य/2020<br>1.8 | वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखेत प्राप्त होणारे सर्व शिक्षणक्रमांचे प्रकल्प आराखडा तसेच प्रकल्प अहवाल Online मागविणेबाबत.. |

ठराव- वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखेत प्राप्त होणारे सर्व शिक्षणक्रमांचे प्रकल्प आराखडा व प्रकल्पा अहवाल शैक्षणिक वर्ष 2019-20 या वर्षापासून प्रवेशात आलेल्या विद्यार्थ्यांचे प्रकल्प आराखडा व प्रकल्प अहवाल Online पध्दतीने मागवावेत. सदर Online पध्दत सुरवातीला एक वर्षासाठी प्रायोगीत तत्वावर अवलंबवावी व त्यानंतर कायम करण्यासाठी निर्णय घ्यावा असे सर्वानुमते ठरले.

सभेच्या शेवटी मा. अध्यक्षांनी सर्वांचे आभार मानले व सभा संपली असे जाहिर केले.

संचालक
वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखा

मा. कुलगुरू यांना इतिवृत्त मान्यतेसाठी सविनय सादर

item 1.3 is not approved. Others are approved

E Vayunandan

मा. कुलगुरू